जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2019
Times of India

# SUK's winter semester exam begins

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The winter semester exam of the Shivaji University, Kolhapur (SUK) began across Sangli, Satara, and Kolhapur districts in over 100 centres from Tuesday.

According to the varsity officials, over 500 exams will be conducted during this period.

G R Palase, in-charge director, board of examinations and evaluation, SUK said, "The exam from Tuesday has begun peacefully across the division. There are no reports of copying as of now."

The official said that six flying squads have been deployed for keeping a tab on the incidents of copying, among other malpractices during exams.

He said that the system of sending an update of student's presence or absence on SMS, which was implemented in winter 2017 examination, will be continued this year as well. Palase said that the system was created to address the post-examination disputes of the students on the exam day itself, rather than addressing it after the exam.

He said that the exam department is continuing with the Secured Remote Paper Delivery (SRPD) system under which the question papers are directly sent to the respective exam centres via online mode in an encrypted format, adding that no new subjects have been added to this semester.

Palase said that around 27 Centralized Assessment Program (CAP) centres have been set up across three districts.

"We are estimating that around three lakh students are expected to appear for this semester examination this year for over 500 exams," said the official.

# उद्योजकांनी अनावश्यक खर्च टाळावा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'आर्थिक मंदीतून सावरण्यासाठी उद्योजकांनी अनावश्यक खर्चाला फाटा देण्याची गरज आहे. उद्योग पूर्वस्थितीवर येईपर्यंत तग धरून राहण्यासाठी उद्योजकांनी स्पर्धेपेक्षा एकमेकांना सहकार्य करावे. सरकारने आर्थिक धोरणांमध्ये बदल केल्यास मंदीतही संधी निर्माण होतील,' असे मत शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी व्यक्त केले.

आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर उद्योजकांना मार्गदर्शन करण्यासाठी कोल्हापूर इंजिनीअरिंग असोसिएशनने आयोजित केलेल्या चर्चासत्रात डॉ. गुरव बोलत होते. उद्यमनगर येथील इंजिनीअरिंग असोसिएशनच्या कार्यालयात गुरुवारी सायंकाळी 'आर्थिक मंदीतून सावरण्याचे उपाय' या विषयावर चर्चासत्र झाले.

डॉ. गुरव म्हणाले, 'चीन, अमेरिकेतील व्यापार युद्ध, इंधनाची दरवाढ, जागतिक पातळीवर मागणीत झालेली घट, बाजारातील बदलते ट्रेंड यामुळे आर्थिक मंदीचा सामना करावा लागत आहे. या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी योग्य नियोजन, संयम आणि कल्पकतेची गरज आहे. अनावश्यक खर्चाला आळा घालण्यासाठी पाणी, वीज आणि मनुष्यबळाचे काटेकोर नियोजन करावे. उद्योगांचे नूतनीकरण किंवा व्याप्ती करणे टाळावे. इंजिनीअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष अतुल आरवाडे यांनी स्वागत केले. यावेळी संचालक रणजित शहा, कमलाकांत कुलकर्णी, रामप्रताप झंवर, श्रीकांत दुधाणे, नरेंद्र माटे, शाम देशिंगकर, जयराजभाई वसा, आदी उपस्थित होते. सचिव प्रदीप व्हरांबळे यांनी सूत्रसंचालन केले.



आर्थिक मंदीवरील उपाययोजनांबाबत आयोजित चर्चासत्रात बोलताना डॉ. ए. एम. गुरव. यावेळी उपस्थित कोल्हापूर इंजिनीअरिंग असोसिएशनचे पदाधिकारी आणि उद्योजक.

**इंजिनीअरिंग असो.च्या चर्चासत्रात डॉ. गुरव यांचे प्रतिपादन**

पुढारी

# विद्यापीठात आज 'बेटी बचाओ' अभियान कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत 'एमएचआरडी' संचलित टिचिंग लर्निंग सेंटर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. १८) सकाळी दहा वाजता मानव्यशास्त्र सभागृहात शिक्षकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2019
तरुण भारत

# मानसशास्त्रीय पुस्तके भविष्याचा वेध घेतील



**कोल्हापूर : पुस्तकांचे प्रकाशन करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. भारती पाटील,डॉ. अश्विनी पाटील, प्रा. अमोल कांबळे आदी.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

भौतिकवादी युगात माणसाचा एकमेकांशी संवाद कमी होत चालला आहे. परिणामी नैराश्य आणि विकृतीत वाढ होत आहे. अशा काळात मानसशास्त्रविषयक लिखाणाला जगभरात मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, डॉ. अश्विनी पाटील यांची पुस्तके भविष्याचा मानसशास्त्रीय वेध घेण्यास दिशादर्शक ठरतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठातील मानसशास्त्र विभागातील डॉ. अश्विनी पाटील लिखित 'दैनंदिन मानसशास्त्र' आणि 'रिझिलियन्स ऑफ अडोलसन्स' या मराठी आणि इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मानसशास्त्र विभागाच्या वतीने समूह संवादाचे उत्कृष्ट मॉडेल तयार करावे. यातून विद्यार्थी, शिक्षकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होईल. त्याचप्रमाणे व्यक्तीगत जीवनातही नात्यातील विश्वास हा कृतीतून सिद्ध करून दाखवावा. सदैव सकारात्मक राहावे. आई-वडिलांशी संवाद स्थापित करावा आणि वास्तववादी जीवनाशी अभ्यासक्रमाशी सांगड घालून आयुष्य आनंदी बनवावे.

**— कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे गौरवोद्गार**

यावेळी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसशास्त्र विभागात विभिन्न विषयांवरील पोस्टर प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अश्विनी पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा. अमोल कांबळे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2019
तरुण भारत

# वाचनाने विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : कनवामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्रंथालयात वेगवेगळ्या प्रकारची, विषयांची पुस्तके असतात. आपल्या आवडीप्रमारणे आणि सवडीप्रमाणे पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. वाचनाने कौशल्य विकास होतो, त्यामुळे तो छंद जोपासलाच पाहिजे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

करवीर नगर वाचन मंदिर आणि बहुद्देशिय वाचन कट्टा व राज्य मराठी विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणादिनानिमित्त अभिवाचन उपक्रम" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, वाचनाने विद्यार्थी उच्च पदावर पोहचतात. अभ्यासाबरोबर आवांतर वाचनाचे नियोजन केले पाहिजे. आयटी क्षेत्रातही वाचनाशिवाय पर्याय नाही,



कोल्हापूर : वाचन प्रेरणादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, युवराज कदम, मनिषा शेणई आदी.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासह विचाराच्या कक्षा रूंदावतात. डॉ. शिर्के यांनी विद्यार्थ्यांमध्ये बसून संवाद साधला. नंदकुमार मराठे यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. विजय माळी व दत्तात्रय डवण यांना ग्रंथभेट देवून सन्मानित करण्यात आले.

युवराज कदम यांनी प्रास्ताविक केले. करवीर वाचन मंदिरच्या मनिषा शेणई यांनी सुत्रसंचालन केले. अश्विनी वळिवडेकर यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, वाचनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2019
तरुण भारत

# महापुरात नष्ट झालेले ग्रंथालय पुस्तके भेटीने झाले समृध्द

## वाचन प्रेरणा दिनानिमित्त राबवला उपक्रम : सुमारे ८०० पुस्तके भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

जिल्ह्यात आलेल्या प्रलंयकारी महापुराच्या पाण्यात शहरातील न्यू पॅलेस स्कूल (नंबर १५) ही शाळा बुडाली होती. त्यामुळे या शाळेच्या ग्रंथालयातील सर्व पुस्तके नष्ट झाली होती. याची दखल घेवून करवीर काशी फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनिलकुमार सरनाईक, शिक्षक संघाचे राज्य प्रतिनिधी अजितकुमार पाटील, शिक्षक संघाचे शहराध्यक्ष मनोहर सरगर, होलिक्रॉस स्कूलच्या शिक्षीका हावळ यांनी या शाळेचे ग्रंथालय उभारण्याचा निर्णय घेतला. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून या सर्वांनी आठशेहून अधिक पुस्तके भेट देवून या शाळेचे ग्रंथालय उभारले.



कोल्हापूर : न्यू पॅलेस शाळेच्या ग्रंथालयाला मुलांना वाचन करण्याकरीता पुस्तकभेट देताना सुनिलकुमार सरनाईक, अजितकुमार पाटील, मनोहर सरगर.

मार्जी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसानिमित्ताने न्यू पॅलेस शाळेने विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्रा. सरीता ठकार, डॉ.सुनिल कुंमार, एस. के.यादव, करवीर काशी फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनिलकुमार सरनाईक, शिक्षक संघाचे राज्य प्रतिनिधी अजितकुमार पाटील, शिक्षक संघाचे शहराध्यक्ष मनोहर सरगर, होलिक्रॉस स्कूलच्या शिक्षीका हावळ आदी उपस्थित होते. अजितकुमार पाटील व मनोहर सरगर यांनी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त पुस्तके शाळेस भेट दिली.

तर सुनिलकुमार सरनाईक यांनी 'शालेय निरोप समारंभ" हे पुस्तक शंभर विद्यार्थ्यांना भेट दिले. तसेच शिवाजी विद्यापीठाचे गणित विभागाचे प्रमुख प्रा. सरीता ठकार यांनी ४०० पुस्तके आणि शिक्षिका हावळ यांनी ३०० पुस्तके दिली.

### शाळेतील मुलांनी घेतला पुस्तक वाचनाचा आनंद

वाचन प्रेरणा दिनी न्यू पॅलेस शाळेतील मुलांनी दिवसभर अग्निपंख, श्यामची आई, विद्यार्थ्यांसाठी बारा संस्कार, फास्टर फेणे, मदर तेरेसा यासारखी पुस्तके वाचनाचा मनमुराद आनंद लुटला.